**नियमित फौजदारी खटला क्र.६५/२०१६**

*मे.व्ही.टेक्स ओव्हरसीज प्रा.लि.*
**विरुध्द**
*महाराष्ट्र सरकार (न्हावाशेवा पोलिस ठाणे)*

## *निशाणी कमांक १ वरील आदेश*

१) सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४५७ अन्वये जप्त मुद्देमाल अनेक रंगाचे सिंथेटीक कापड एक गठाण वजन १०२ किलो रक्कम रु.१,१८,०००/- किंमतीच्या मालाचा अंतरिम ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार हा मे.व्ही.टेक्स ओव्हरसीज प्रा.लिमी. या कंपनीत एक्झीक्युटीव्ह या पदावर कार्यरत असुन सदर कंपनीमध्ये कपडयावर एम्रॉयडरी केली जाते व बाहेर देशात माल निर्यात केला जातो. सदर कंपनीने दि.०५/०३/२०१६ रोजी अफ्रिका मधील नायजेरीया येथील इगल विंग ॲन्ड स्टार ग्रॅड लॉजिस्टिक्स लिमी. कंपनीची ऑर्डर मिळाली. त्याप्रमाणे अर्जदाराचे कंपनीने १५० किलोचे एक बंडल याप्रमाणे १६६ बंडल कपडयाचा माल दि.१५/०४/२०१६ रोजी एस.नॅशनल कंटेनर मुव्हर्स टान्सपोर्ट कंपनीचा टेलर क्र.एम.एच.४३/यु.२३१६ वरील चालक घनश्याम गुप्ता व क्लिनर यांचेकडे सोपविला असता तो टेलर भिवंडी येथून एन.एस.सी.आय.टी येथे निघाला. परंतु सदरचा टेलर पोर्टमध्ये पोहोचला नाही. त्यामुळे अर्जदार याने न्हावाशेवा पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. २७/२०१६ अन्वये तक्रार दाखल केली. सदर गुन्हयाचे तपासामध्ये न्हावाशेवा पोलिसांनी १५४८० किलो वजनाचा माल जप्त केला होता पैकी काही माल अर्जदार यांनी फौ.चौ.अर्ज क्र.१२१/१६ प्रमाणे न्यायालयाकडून मिळविला

आहे. सदर अर्जातील जप्त मुददेमाल हा पोलिसांनी पुढील तपासामध्ये जप्त केलेला असून सदरचा मुददेमाल पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास अर्जदाराचे नुकसान होणार आहे. सदरचा मुददेमाल हा अर्जदाराचे कंपनीच्या मालकीचा असून सदरचा मुददेमाल हा खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुददेमाल अर्जदाराचे ताब्यात दयावा, अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

३) सरकारी वकिलांचा तसेच तपासी अंमलदार यांचा खुलासा मागविण्यात आला. सरकारी वकिलांनी पोलिसांनी जप्त केलेला माल व अर्जदार मागणी करीत असलेल्या माल याच्या वजनामध्ये व किंमतीमध्ये तफावत असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

४) तसेच तपासी अंमलदार यांनी नि.क्र.१०४ वर म्हणणे देवून, सदरचा मुददेमाल अर्जदारास योग्य त्या शर्ती अटींवर परत करण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे.

५) अर्जदाराचे वकीलांनी त्यांचे युक्तिवादामध्ये जप्त मुददेमाल न्हावाशेवा पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास तो खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जप्त मुददेमाल अर्जदारास परत केल्यास अर्जदार न्यायालयाचे अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार असल्याबाबत कथन केले.

६) अर्जदारातर्फे अर्जदाराने न्हावाशेवा पोलिस ठाणे येथे नोंदविलेल्या एफ.आय.आर.ची प्रत, अर्जदार याच्या कंपनीच्या ओळखपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदाराच्या आधारकार्डाची प्रमाणित प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, पोलीसांनी जप्त केलेल्या मालाचा मालक अर्जदाराची कंपनी आहे. तसेच अर्जदार हा न्यायालयाचे सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे.

अशा परिस्थितीमध्ये व तपासी अंमलदार यांनी दिलेल्या म्हणण्याचा विचार करता सदरचा मुददेमाल हा मालक म्हणून अर्जदाराचे ताब्यात देखभालीकरीता देणे योग्य होईल, असे मला वाटते. सबब, अर्जदाराचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याने, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | जप्त मुद्देमाल - अनेक रंगाचे सिंथेटीक कापड एक गठाण वजन १०२ किलो रक्कम रु.१,१८,०००/- किंमत हा अर्जदार यांनी रक्कम रु.१,१८,०००/-(रुपये एक लाख अठरा हजार मात्र) चे हानीरक्षक बंधपत्र दिल्यानंतर त्याचे ताब्यात दयावा. |
| ३. | अर्जदार याने या केसचा निकाल होईपर्यंत सदर मुद्देमालाची विक्री करु नये, अथवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये अथवा त्याचे स्वरुप बदलू नये. |
| ४. | अर्जदाराने जप्त मुद्देमाल न्यायालय सांगेल त्यावेळी न्यायालयात हजर करावा. |

उरण.
दिनांक : १२.०४.२०१८.

(ए.बी.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उरण.